# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)

## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY

NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.

Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade





**NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT**

Phone: (02462) 229242
Fax : (02462) 229574

Website: www.srtmun.ac.in E-mail: srtmun.nss2018@gmail.com


जा.क्र. : रासेयो/२०१८–१९/1289 दिनांक: ०८.०२.२०१९

प्रति,
मा.प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी रा.से.यो.
राष्ट्रीय सेवा योजना राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तूत विद्यापीठ.

विषय:– कार्यक्रम समन्वयक कार्यक्रम अधिकारी यांचे दोन दिवसीय अधिवेशन/कार्यशाळा आयोजनाबाबत.

संदर्भ:– मा. राज्यसंपर्क अधिकारी व विशेष कार्यअधिकरी उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय कक्ष दिनांक ३० जोनवारी २०१९ रोजीच्या पत्रान्वये.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भाकित विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्य महाराष्ट्रातील कार्यक्रम अधिकाऱ्यांचे दोन दिवशीय अधिवेशन दिनांक १४ ते १५ फेब्रुवारी २०१९ दरम्यान पुणे येथील बालेवाडी क्रिडा संकुल येथे आयोजित करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमामध्ये शासनाचे गृह विभाग, आरोग्य विभाग, महिला व बालविकास विभाग, राष्ट्रीय उच्च स्तर शिक्षा अभियान (रूसा) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, नवी दिल्ली विभागांचे माननीय अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव, तसेच विभागाचे मा.प्रधान सचिव (उवतंशि), सहसचिव (विशि,) उपसचिव (आस्था), उपसचिव (साशि) यांना आमंत्रित केले असुन त्या त्या विभागातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य व विभागास अपेक्षित मदत यावर विचार विनिमय होणार आहे. सदर कार्यशाळेचे उद्घाटन मा. मंत्री (उवतंशि) मा. राज्यमंत्री (उवतंशि) मा. सचिव (उवतंशि) यांचे शुभहस्ते होणार आहे. कार्यक्रम अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

आपल्या महाविद्यालयातील अधिनस्त फक्त एक कार्यक्रम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी. तसेच ज्या महाविद्यालयात जिल्हा समन्वयक, विभागीय समन्वयक यांची नेमणूक करण्यात आली आहे.अशा महाविद्यलयातील कार्यक्रमअधिकाऱ्यांनी या कार्यशाळेत सहभागी होऊ नये. मात्र जिल्हा समन्वयक, विभागीय समन्वयक यांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे. मा. कुलगुरू महोदय या चर्चासत्रामध्ये सहभागी होवून आपल्याशी कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत मार्गदर्शन करणार आहेत. तसेच आपल्या महाविद्यालयांनी रासेयो अंतर्गत राबविलेल्या प्रतिकृतीचे सादरीकरण करण्यांत यावे.

सदरील चर्चासत्रात सहभागी होण्यासाठी मा. कार्यक्रम समन्वयक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्याकडे त्वरीत कळविण्यात यावेत. हि विनंती.

प्रवास खर्च सबंधीत महाविद्यालयाच्या रा.से.यो. नियमित कार्यक्रम अनुदानातून देय राहील.

संपर्कासाठी
१. श्री प्रभाकर देसाई,कार्यक्रम समन्वयक,तथा संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ,पुणे भ्रमणध्वनी क्र. ९८८१९०८०२०.
२. श्री दिनेश जाधव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे भ्रमणध्वनी क्र. ९८९०४१४०७५, दुरध्वनी क्र. ०२०–२५७११५३/०२०–२५७११४१.

प्रो.डॉ.डी.डी.पवार
रासेयो कार्यक्रम समन्वयक,
प्रस्तूत विद्यापीठ

०१. मा. सिस्टीम एक्सपर्ट तांत्रिक संगणक सहाय्यक कक्ष,प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.

Scanned by CamScanner